CNR NO.MHSO060007932021

<u>नियमित दिवाणी दावा क्र.६१ /२०२१</u>

महेश साठे

वि.

रंजन डोंबे, वगैरे

<u>**निशाणी क्रमांक १४० वरील आदेश**</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने दि. पंढरपूर मर्चंट को–ऑपरेटिव्ह बँक, पंढरपूर यांचे व्यवस्थापक श्री.अतुल म्हमाणे यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ठ करण्याचे निर्देश वादीस देण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे कथन आहे की, वादीने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता दि. पंढरपूर मर्चंट को–ऑपरेटिव्ह बँक यांचेकडुन कर्ज काढलेले आहे. अशाप्रकारे वादमिळकतीत वादीने तिऱ्हाईत इसमाचे हक्क निर्माण केलेले आहेत. याबाबत प्रतिवादी क्र.१ ने बँकेचे व्यवस्थापकांना तक्रार अर्ज दिला असता, बँकेने प्रतिवादी क्र.१ यास खुलासा पाठविला. खुलासा पाहता बँक आवश्यक पक्षकार आहे. भविष्यात देखील बँक वादीस कर्ज देण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी खरेदी केलेली जमीन एकच आहे. सबब, गहाणखताचा व्यवहार करुन वादीने गुंतागुंत निर्माण केलेली आहे. करिता, बँकेच्या व्यवस्थापकास दाव्यामध्ये पक्षकार करण्यात यावे.

३. वादीने सदरील अर्जास त्यांचे म्हणणे (निशाणी क्र.१४३) दाखल केले. वादीने अर्जातील सर्व प्रतिकूल कथने नाकारली. वादीने कथन केले की, दाव्यामध्ये प्रतिवादी कोणास करावयाचे हा पूर्ण अधिकार वादीचा आहे. अर्ज कायदेशीर नाही. करिता, फेटाळण्यात यावा.

४. वादीचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीचा लेखी युक्तिवाद (निशाणी क्र.१५३) विचारात घेण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र.१ तर्फे दाखल मा. सर्वोच्च न्यायालयाचा <u>***बालुराम वि. पी. चेल्लाथंगम (२०१५) १३ एस.सी.सी. ५७९***</u> मधील

न्यायनिर्णय तसेच मा. उच्च न्यायालयाचा ***इलाईट वि. राज–गृह को.ऑप. हौसिंग सोसायटी, (२०११) २ बॉम्बे सी.के.७७*** मधील न्यायनिर्णय विचारात घेण्यात आले. तसेच वादीतर्फे दाखल निशाणी क्र.१५७ वरील कागदपत्र विचारात घेण्यात आले. त्यावरुन असे दिसते की, वादीच्या नांवावरील कर्ज बोजाची नोंद कमी करण्याचे पत्र संबंधित बँकेने दुय्यम निबंधक कार्यालयास दिलेले आहे. सदरील बाब पाहता तसेच दाव्याचे स्वरुप पाहता केवळ प्रतिवादी क्र.१ यांचे म्हणण्यानुसार बँकेच्या व्यवस्थापकास दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन सहभागी करुन घेण्याचे कारण नाही. प्रतिवादी क्र.१ चा मालकी हक्काची घोषणा व कायमचा मनाई हुकूम मिळण्याचा दिवाणी दावा क्र.५९१/२०१७ हा प्रलंबित आहे. वादीने गट क्र.१०३/१ बाबत दावा आणलेला असुन, प्रतिवादी क्र.१ चा दावा गट क्र.१०३/२ब/२ब/२ च्या अनुषंगाने आहे. सदरील बाब पाहता प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेले न्यायनिर्णय त्यास या अर्जाच्या अनुषंगाने उपयोगी पडत नाहीत. करिता, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता, खालील आदेश.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(नीलेश सु. बुद्रुक)

दि. ०८.०९.२०२५

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर.

## **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. on | : | 08.09.2025 |
| (d) | Uploaded on | : | 09.09.2025 |